# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे    **P.S.(ठाणे):** शिरपुर शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0051    **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/02/2026 21:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार    **Date From (दिनांक पासून):** 12/02/2026

**Time Period (कालावधी):** पहर 4    **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/02/2026

**Time From (वेळेपासून):** 12:32 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/02/2026    **Time (वेळ):** 20:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 032

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/02/2026 20:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 03 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शिरपुर तालुका कषी कार्यालयात,शिरपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पद्मावती कलाल पो. निरी. ला.प

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे,शिरपुर शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे,शिरपुर शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788986178

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय हिम्मतराव पवार | | | 1. महावीर कालनी, साक्री रोड, धुळे,धुळे,शिरपुर शहर,धुळे, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुनिल धनराज पाटील | | | 1. जुने भामपुर,शिरपुर ,शिरपुर शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपये दराच्या 10 चलनी नोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी पद्मावती मधुसुदन कलाल,वय 43 वर्षे,पोलीस निरीक्षक,लाप्र वि,धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देते की,आम्ही ला प्रति वि, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे सहा महिन्यापासुन कार्यरत आहोत.दि. 11.02.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उपअधीक्षक श्री सचिन साळुंखे यांनी कार्यालयात हजर असलेले तक्रारदार प्रशांत नामदेव धनगर यांची शिरपुर तालुका कृषी विभागातील लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार असुन त्यांची तक्रार घेवुन पुढील कार्यवाही करणेबाबत आम्हास आदेशित केल्याने आम्ही मा.सहा.आयुक्त समाज कल्याण विभाग,धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील दोन शासकिय कर्मचारी श्रीमती सुवर्णा विजय जोगी,कनिष्ठ लिपीक व राजेश मधुकर काळे,वरिष्ठ लिपीक यांना उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक,ला.प्र.विभाग,धुळे अशी ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली.तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार प्रशांत नामदेव धनगर व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव प्रशांत नामदेव धनगर,वय 26 वर्ष, व्यवसाय-व्यापार, रा.भावेर,ता.शिरपुर,जि.धुळे असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली, त्यानंतर तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची तक्रार कार्यालयातील संगणकावर टंकलिखीत करण्यात आली ती ''माझे मौजे बभळाज, ता. शिरपुर येथे शासनमान्य ओमसाई फर्टिलायझर या नावाचे बि-बियाणे व खते विक्रीचे दुकान आहे. सदर दुकानात महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या,अकोला यांचेकडुन कृषी उन्नती योजना-राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत गहु प्रमाणित बियाणे वितरीत केली जातात.मी माझ्या दुकानामार्फत महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित,अकोला यांचेकडुन शासकीय अनुदानित गव्हाचे बियाणे खरेदी करुन ते सन 2025-26 मध्ये 90 शेतकऱ्यांना शासनाचे अनुदान वजा जाता विक्री केले आहे. मी शेतकऱ्यांना विक्री केलेल्या गव्हाचे बियाण्या वरील 1,40,000/- रुपये शासकिय अनुदान महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित,अकोला अंतर्गत धुळे कार्यालयाकडुन मिळणेकरीता बियाणे विक्री केलेल्या 90 शेतकऱ्यांची यादी आवश्यक त्या कागदपत्रासह तालुका कृषी कार्यालय, शिरपुर येथे काल दि.10.02.2026 रोजी जमा करण्यास गेलो असता सदर कार्यालयातील संबंधीत डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांनी माझे कागदपत्रे जमा करुन घेवुन मला ''तुम्ही शेतकऱ्यांना विक्री केलेल्या गव्हाचे बियाण्यांचे अनुदान मिळणे करीताची शेतकऱ्यांची यादी तालुका कृषी अधिकारी पवार साहेब यांचेकडुन तपासणी करुन घ्यावी लागेल.त्याकरीता पवार साहेबांसाठी माझयाकडे 5,000/- रुपये दयावे लागतील त्याशिवाय तुमचे काम होणार नाही.'' असे सांगुन लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शिरपुर येथे जावुन त्यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगितले.त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाने तसेच तक्रारदार हे त्यांच्या मोटार सायकलने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना होवुन शिरपुर शहरातील अमरीशभाई पटेल यांचे रिक्रिएशन गार्डनजवळ पोहोचलो. तेथे पडताळणी कार्यवाहीबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या.त्यानंतर तक्रारदार व डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांच्यात मोबाईलवरुन झालेल्या चर्चेत सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांना शिरपुर एस.टी. स्टॅण्डजवळ भेटण्यास बोलविले. तेव्हा आम्ही तेथुन खाजगी वाहनाने व तक्रारदार हे त्यांच्या मोटार सायकलने रवाना होवुन शिरपुर शहरातील एस. टी. स्टॅण्ड जवळील गायत्री हॉस्पीटल जवळ येवुन थांबलो.तेव्हा तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करुन

देवुन त्यांना आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन शिरपुर एस.टी.स्टॅण्ड येथे डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांची भेट घेण्यासाठीे पंच नं. 01 श्रीमती सुवर्णा जोगी यांचेसह तक्रारदार यांच्या मोटार सायकलने रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच सुवर्णा जोगी असे आमचे जवळ परत आले. तेव्हा पंच नं. 01 जोगी यांना विचारणा केली असता त्यांनी ''तक्रारदार व डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांच्यात तक्रारदार यांच्या कामाबाबत चर्चा झाली. तेव्हा डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यांनी तक्रारदार यांना साहेबांशी बोलुन घ्या असे सांगुन प्रमाणित केलेल्या अनुदानाच्या याद्या दिल्याची हकिगत कथन केली. तसेच तक्रारदार यांनी देखील पंच नं. 01 यांचे सांगणेप्रमाणे हकिगत सांगितली. सदर डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रित झालेले संभाषण एेकुन खात्री करण्यात आली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्याशी चर्चा करुन पडताळणी कार्यवाही दरम्यान डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांनी साहेबांशी बोलुन घ्या असे सांगितले असल्याने आम्ही तालुका कृषी अधिकारी संजय पवार यांना भेटुन पडताळणी कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन शिरपुर तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तालुका कृषी अधिकारी संजय पवार यांची भेट घेण्यासाठीे पंच नं. 01 श्रीमती सुवर्णा जोगी यांचेसह तक्रारदार यांच्या मोटार सायकलने रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच सुवर्णा जोगी असे आमचे जवळ परत आले. तेव्हा पंच नं. 01 जोगी यांना विचारणा केली असता त्यांनी ''तक्रारदार यांची तालुका कृषी अधिकारी संजय पवार यांचेशी त्यांचे कक्षात भेट झाली. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना महाबीजच्या अनुदानाच्या याद्या डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांच्याकडे दिल्या असल्याचे सांगुन ते पैशांच सांगत आहेत असे सांगितले. तेव्हा संजय पवार साहेबांनी त्याच्याच कडे, तो त्याचा काय विषय आहे असे तक्रारदार यांना सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी ते पाच हजार सांगत आहेत असे संजय पवार साहेबांना सांगितले असता संजय पवार साहेबांनी त्यांच्याच कडे द्या ना, माझा काही विषय नाही. असे सांगुन तक्रारदार यांना डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांना लाचेची रक्कम देण्याबाबत अनुकुलता दर्शवुन त्यास दुजोरा दिला. त्यानंतर तक्रारदार यांची सुनिल पाटील यांचेशी भेट झाली. तेव्हा सुनिल पाटील यांनी त्यांना दिलेल्या प्रमाणित याद्यांची एक प्रत ओसी म्हणुन मला परत द्या असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी उद्या आल्यावर देतो असे सांगितल्याची हकिगत सांगितली. तसेच तक्रारदार यांनी देखील पंच नं. 01 यांचे सांगणेप्रमाणे हकिगत सांगितली. सदर डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रित झालेले संभाषण एेकुन खात्री करण्यात आली. दरम्यान डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांना फोन करुन घरी गेल्यावर फोन कर असे सांगितल्याचे तक्रारदार यांनी आम्हास सांगितल्याने आम्ही सदर ठिकाणीच तक्रारदार यांना थांबवुन घरी गेल्याचे भासवुन डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांना काही वेळाने फोन करण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी सुनिल पाटील यांना कॉल केला असता सुनिल पाटील यांनी कॉल रिसिव्ह केला नाही. त्यानंतर काही वेळाने सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांना फोन करुन ते व्हॉटसएॅप कॉल करीत आहेत त्याच्यावर बोला असे सांगितले. त्यानंतर सुनिल पाटील यांचा तक्रारदार यांच्या व्हॉटसएॅपवर फोन करुन तक्रारदार यांनी तालुका कृषी अधिकारी संजय पवार यांच्याशी झालेल्या भेटीबाबत चर्चा करुन परस्पर भेट घ्यायला नको होती. ते तुझयाशी डायरेक्ट बोलतील का? त्यांना भेटण्या अगोदर मला भेटायला पाहिजे होते. उद्या वडीलांना घेवुन त्यांना भेटुन घ्या असे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेशी चर्चा करुन दि.11.02.2026 रोजी झालेल्या पडताळणी कार्यवाहीवरुन आज दि.12.02.2026 रोजी शिरपुर तालुका कृषी अधिकारी संजय पवार व डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांचेवर सापळा कारवाई आयोजित करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवुन तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर आज दि.12.02.2026 रोजी आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाने व शासकिय वाहनाने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना होवुन शिरपुर शहरातील चोपडा जिनच्या बाजुला असलेल्या ओम हॉस्पीटल जवळ पोहोचलो. तेथे ठरल्याप्रमाणे तक्रारदार त्यांच्या मोटारसायकलसह आम्हास भेटले. तेव्हा आम्ही त्यांना शासकिय वाहनात बसवुन घेतले. तेव्हा तक्रारदार यांनी सापळा कारवाईकामी त्यांचेकडील 5,000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 10 चलनी नोटा वाहनाच्या सिटवर ठेवल्या. सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांंच्या शर्टाच्या खिशात ठेवुन दिली. तसेच तक्रारदार यांच्याकडे डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांनी मागितलेली प्रत तक्रारदार यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 श्रीमती सुवर्णा जोगी अशांना तक्रारदार यांच्या मोटार सायकलने शिरपुर तालुका कृषी कार्यालयात डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पोलीस निरीक्षक श्री यशवंत बोरसे, पंच नं. 2 राजेश काळे, पोकॉ. मकरंद पाटील, पोकॉ. प्रशांत

बागुल, पोकॉ. रामदास बारेला, चापोहेकॉ. सुधीर मोरे यांचेसह खाजगी व शासकिय वाहनांनी तालुका कृषी कार्यालयाचे आवारात व आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा आम्ही पंच नं. 1 यांना विचारणा केली. तेव्हा पंच नं. 1 यांनी ''मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या मोटार सायकलने या कार्यालयात आलो. तेव्हा तक्रारदार यांनी डाटा इंट्री ऑपरेटर सुनिल पाटील यांची भेट घेतली. तेव्हा सुनिल पाटील यांनी साहेब मिटींगला गेल्याचे सांगितले. दरम्यान सुनिल पाटील यांचे संजय पवार साहेबांशी मोबाईलवर संभाषण झाले. त्यानंतर सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांना साहेब निघुन गेले असुन ते उद्या येतील असे सांगुन सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे यादीची एक प्रत मागुन हाताच्या इशाऱ्याने पैशांबाबत विचारणा केली. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशातील यादीची प्रत काढुन सुनिल पाटील यांना देवुन त्यांच्या शर्टाच्या खिशातील लाचेची रक्कम काढुन सुनिल पाटील यांचेसमोर धरली असता त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारुन कार्यालयातील कपाटात ठेवुन घेतली, तेव्हा तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केला.'' अशी हकिगत सांगितली. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोकॉ. मकरंद पाटील यांनी सुनिल पाटील यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन त्यांना अटकावुन ठेवले. त्यानंतर सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम घेवुन कार्यालयातील कपाटात ठेवली असल्याने आमचे सुचनेवरुन पंच नं. 2 राजेश काळे यांनी सदर कपाटात ठेवलेली लाचेची रक्कम ताब्यात घेवुन लाचेच्या रकमेची खात्री केली. त्यानंतर घटनास्थळावरील कार्यवाही आटोपल्यानंतर कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला. दरम्यान पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे, पोहेकॉ. राजन कदम व मुकेश अहिरे यांनी तालुका कृषी अधिकारी संजय पवार यांना मध्यवर्ती कार्यालय, जवाहर शिक्षण प्रसारक संस्था, धुळे येथुन ताब्यात घेतले.

अशा प्रकारे आलोसे सुनिल धनराज पाटील, डाटा इंट्री ऑपरेटर यांनी तक्रारदार यांच्या बियाणे विक्री केलेल्या शासकिय अनुदानाची यादी प्रमाणित करुन देण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले. तसेच सदर लाच मागणीस आलोसे संजय हिम्मतराव पवार यांनी दुजोरा देवुन अपप्रेरणा दिली. त्यानंतर दि.12.02.2026 रोजी झालेल्या सापळा कारवाई दरम्यान शिरपुर तालुका कृषी कार्यालयात 12:41 वाजता आलोसे सुनिल धनराज पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडुन 5,000/- रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारुन नमुद आलोसे यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 व 12 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

kishorkumar Bhilasing pardeshi(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम** खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अमलदार
शिरपुर शहर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** kishorkumar Bhilasi

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**